# जाहिरात क्र. ०१/२०२३
# शुद्धीपत्रक क्र. १
# दिनांक - १८/०८/२०२३

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| १ | कनिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | कनिष्ठ सहाय्यक / कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या संवर्गासाठी मराठी टंकलेखन आवश्यक करण्यात आलेले आहे, असे जाहिरातीत नमूद आहे.<br><br>तथापि माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी, पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी व अनाथ मधून अर्ज करणाऱ्या ज्या उमेदवारांकडे मराठी टंकलेखन नाही, असे उमेदवार देखील अर्ज करू शकतील. |
| २ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या संवर्गाचा ऑनलाईन अर्ज करताना Have you passed recognized equivalent two Years Course in Construction Supervisor? असा प्रश्न विचारणेत आला होता. परंतू सदरचा कोर्स हा एक वर्षाचा असल्यामुळे त्या पदासाठी उमेदवार अर्ज सादर करू शकत नव्हते.<br>तथापि त्यामध्ये सुधारणा करणेत आली असून आता Have you passed recognized equivalent Course in Construction Supervisor? असा प्रश्न विचारणेत येत आहे. त्यामुळे सदर पदासाठी इच्छुक उमेदवार आपले अर्ज सादर करू शकतील. |

# जाहिरात क्र. ०१/२०२३
# शुद्धीपत्रक क्र. २
# दिनांक – २०/०८/२०२३

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| १ | कंत्राटी ग्रामसेवक / पशुधन पर्यवेक्षक | कंत्राटी ग्रामसेवक / पशुधन पर्यवेक्षक या संवर्गामध्ये संगणक हाताळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार अर्ज करू शकतात असे जाहिरातीत नमूद आहे.<br>आता त्याचबरोबर जे उमेदवार दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्तीर्ण झाले असतील.<br>किंवा<br>अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) मार्फत मान्यताप्राप्त सर्व पदवी व पदवीका (सर्व अभियांत्रिकी शाखा) प्राप्त उमेदवार<br>किंवा<br>इंडियन सटिफिकेट ऑफ स्कूल एज्युकेशन (ICSC) यांच्या मार्फत मान्यतापा्रप्त इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले संगणक व माहिती तंत्रज्ञान संबंधित विषय घेऊन उत्त्तीर्ण झाले असतील.<br>वरीलपैकी कोणत्याही एक प्रकारे संगणक व माहिती तंत्रज्ञानाबाबतचे प्रमाणपत्र धारण करीत असतील असे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करू शकतात. |

# जाहिरात क्र. ०१/२०२३
# शुद्धीपत्रक क्र. ३
# दिनांक – २३/०८/२०२३

| अ.क्र. | संवर्गाचे नाव | सुधारणा |
|---|---|---|
| १ | विस्तार अधिकारी (शिक्षण) | विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गामध्ये ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराचा अनुभव हा सदर पदाची शैक्षणिक अर्हता धारण केल्यानंतरचा ग्राह्य धरला जात होता.<br>तथापि आता सदर पदाचा ऑनलाईन अर्ज करताना उमेदवाराचा अनुभव हा सदर पदाची शैक्षणिक अर्हता धारण करण्यापुर्वीचा असेल तरी तो ग्राह्य धरला जाणार आहे. |